# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:08.01.2026** **वार:गुरुवार**

1. वर्तमान आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक वृद्धी दर 7 पूर्णांक 4 दशांश टक्के राहण्याचा अंदाज
2. राज्यात अवयव दानामध्ये पुणे विभागाची आघाडी
3. महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध पक्षांतर्फे जाहिरनामे, वचनपत्र जारी आणि
4. छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात 26 नक्षलवाद्यांची शरणागती

**आर्थिक वृद्धीदर**

वर्तमान आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक वृद्धी दर 7 पूर्णांक 4 दशांश टक्के राहण्याचा अंदाज केंद्र सरकारनं वर्तवला आहे. मागील वर्षी हा दर साडेसहा टक्के होता. वर्तमान आर्थिक वर्षात सकल देशांतर्गत उत्पन्न 201 लाख कोटी रुपयांहून जास्त होण्याची शक्यता आहे. 2024-25 या आर्थिक वर्षात हे उत्पन्न 187 लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल, असा सरकारचा प्राथमिक अंदाज होता. या आर्थिक वर्षात प्रसारण क्षेत्राशी संबंधित व्यापार, हॉटेल्स, वाहतूक, दळणवळण आणि सेवांमध्ये 7 पूर्णांक 5 दशांश टक्के वाढ होण्याचा अंदाज असून दुय्यम क्षेत्रातील उत्पादन आणि बांधकाम क्षेत्रात 7 टक्के वाढ होण्याचा अंदाज आहे.

**अवयवदान**

राज्यात अवयवदानात पुणे विभागानं आघाडी घेतली आहे. गेल्या वर्षी राज्यात 153 जणांचं मरणोत्तर अवयवदान करण्यात आलं. त्यातील 79 जण पुणे विभागातील असून, त्यातून 207 गरजू रुग्णांना जीवदान मिळालं. मूत्रपिंड, यकृत, फुफ्फुस, हृदय, अशा अवयवांचा त्यात समावेश होता. अवयवदानाबाबत जनजागृती वाढत असून अनेक गंभीर रुग्णांना नवसंजीवनी मिळत आहे. तरी देखील गरजू रुग्णांची संख्या पाहता अधिकाधिक संख्येनं अवयवदानाचा संकल्प करण्याची गरज असल्याचं पुणे विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समितीच्या समन्वयक आरती गोखले यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं...

**वेटिंग लिस्ट जी आहे ज्यांना ऑर्गन्सची गरज आहे ती खूप जास्त आहे. त्यामुळे अजून सुद्धा जास्तीत जास्त ऑर्गन डोनेशन व्हायला हवं. महाराष्ट्रात किंवा भारत देशामध्ये जेणेकरून आपली वेटिंग लिस्ट कमी होईल, आणखीन जे खरोखरच पेशंट आहेत क्रॉनिक इलनेसेसनी त्यांना हे ऑर्गन मिळाल्यानंतर ट्रान्सप्लांट झाल्यानंतर एक नवीन आणि छान आयुष्य सुरू करता येईल. त्यामुळे त्या दृष्टीने आपण सगळ्यांनी सर्व स्तरांवरती खूप प्रयत्न करायला हवेत. त्याच्याकरता शासनाचे पण खूप मोठ्या प्रमाणावर प्रयत्न चालूच आहेत, पण एनजीओ हॉस्पिटल्स आणखी इतरही सेवाभावी संस्था त्याच्यामध्ये जास्तीत जास्त पुढाकार घेऊन ऑर्गन डोनेशनचा किंवा अवयवदानाचा प्रचार आणि प्रसार जास्तीत जास्त केला पाहिजे आणि जिवंतपणी आपली अवयदानाची इच्छा फॉर्म भरून प्रदर्शित केली पाहिजे मरावे परी अवयवरुपी उरावे आणि आठवणीत राहण्यापेक्षा आठ जणांमध्ये राहावे.**

**निवडणूक प्रचार**

राज्यात महापालिका निवडणुकीच्या प्रचाराचा जोर वाढत आहे. विविध पक्षांचे ज्येष्ठ नेते आणि उमेदवार प्रचारसभा घेत आहेत. मुख्यमंत्री आणि भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी काल लातूर, भिवंडी आणि उल्हासनगर महानगरपालिकेसाठी प्रचारसभा घेतल्या.

लातूरमध्ये पुनः रेल्वेनं पाणी पुरवठा करण्याची वेळ येणार नाही अशी ग्वाही फडणवीस यांनी आपल्या प्रचारसभेत दिली. भिवंडीच्या सर्वांगीण विकासासाठी महायुतीचा महापौर होणं अत्यावश्यक असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

राज्यात काँग्रेस आणि एमआयएमसोबतची युती कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला. अंबरनाथ आणि अकोला जिल्ह्यातील आकोट इथं स्थानिक नेत्यांनी अशा प्रकारची युती केल्याच्या वृत्तावर त्यांनी ही प्रतिक्रिया दिली.

उपमुख्यमंत्री आणि शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी अकोला आणि अमरावतीमध्ये जाहीर सभा घेतल्या. अमरावती जिल्ह्यातील पाणी, भुयारी गटार, अशा अनेक समस्या सोडविण्यासाठी शिवसेनेच्या उमदेवारांना निवडून द्या असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी काल पुण्यात पथफेरीद्वारे प्रचार केला. महानगरपालिका निवडणुकीसाठी धोरणात्मक मोहीम मोहीम शहरातील पाण्याच्या टँकरपासून ते वाहतुक कोंडीपर्यंत नागरिकांच्या दैनंदिन संघर्षावर केंद्रित असल्याचं त्यांनी सांगितलं.

**जाहीरनामे**

पुणे महापालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षातर्फे काल संकल्पपत्र जाहीर करण्यात आलं. यात मेट्रो, विमानतळ विस्तार, नागरवस्ती नियोजन, आर्थिक दुर्बल घटकातील व्यक्तींना मिळकत कर माफी, 75 वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना पी एम पी एम एल चा प्रवास मोफत, तीस वर्षावरील प्रत्येक पुणेकरांची मोफत वार्षिक आरोग्य तपासणी, महिलांना सवलतीच्या दरात मेट्रो आणि बस प्रवास इत्यादी आश्वासनं या संकल्प पत्रात देण्यात आली आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसनं काल मुंबईकरांसाठी सर्वसमावेशक जाहिरनामा प्रकाशित केला. मुंबई बहुभाषिक, बहुजातीय नागरीक राहतात, या सर्वांना विश्वासात घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस या निवडणुकीला सामोरे जात असल्याचं खासदार सुनिल तटकरे यांनी यावेळी स्पष्ट केलं. पायाभूत सुविधा आणि विकास यावर भर देताना पाणी पुरवठा, घनकचरा व्यवस्थापन यासह पाच वर्षांत 500 किलोमीटर नवे रस्ते बांधणार असल्याचं आश्वासन यावेळी देण्यात आलं.

कोल्हापुरात काल काँग्रेस पक्षाचा जाहीरनामा खासदार शाहू छत्रपती आणि आमदार सतेज पाटील यांनी प्रसिद्ध केला. तातडीची दहा हजार रुपयांची वैद्यकीय मदत, आंतरराष्ट्रीय दर्जाचं क्रीडा संकुल, प्रभावी कचरा व्यवस्थापन, अंबाबाई तीर्थक्षेत्र विकास आराखडयाचा या जाहीरनाम्यात समावेश करण्यात आला आहे.

**कारवाई**

महानगरपालिका निवडणुकांसाठी मतदान आणि मतमोजणीच्या प्रशिक्षणाला गैरहजर राहणाऱ्या अधिकारी- कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले आहेत. महानगरपालिका निवडणुकांसाठी मतदान तसंच मतमोजणीची तयारी आणि कायदा आणि सुव्यवस्थेसंदर्भात सर्व 29 महानगरपालिका आयुक्त, संबंधित पोलिस आयुक्त आणि जिल्हा पोलिस अधीक्षक; तसंच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची दूरचित्र संवादाच्या माध्यमातून बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.

**आरोग्य-सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांच्या संकल्पनेतून 2026 या नव्या वर्षात साठ वर्षावरच्या वृद्धांच्या आरोग्याची काळजी घेणारी योजना राबवण्यात येणार आहे. सध्या पणदूर आणि कनेडी या दोन प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत हा उपक्रम प्रायोगिक तत्त्वावर राबवला जात आहे. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**वयाची साठी ओलांडल्यानंतर अनेक लोक विविध आजारांनी व्याधीग्रस्त बनतात. गावात राहणाऱ्या या वृद्धांना वेळेत उपचार मिळावेत यासाठी या वृद्धांची काळजी घेण्याची योजना राबवण्याची संकल्पना जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी पुढे आणली आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर सई धुरी यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य यंत्रणेमार्फत ही योजना राबवली जाणार आहे. ही योजना पहिल्यांदा कुडाळ तालुक्यात पणदूर आणि कणकवली तालुक्यात कनेडी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत प्रायोगिक तत्वावर राबवायला सुरुवात झालीय. 60 वर्षावरच्या रुग्णांची माहिती संकलित करून त्यांच्यावर कोणते उपचार करावेत, कोणती औषध द्यावीत याबाबत संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रांना सूचना देण्यात येणार आहेत. आणि तसे उपचार त्या रुग्णांना पुरवले जाणार आहेत. या वृद्ध रुग्णांच्या आरोग्याचा सतत फॉलोअप घेतला जाणार आहे. जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांच्या या संकल्पनेला आरोग्य विभागाकडून सुद्धा चांगला प्रतिसाद मिळतोय. त्यामुळे पुढच्या काळात जिल्ह्यातल्या वृद्धांचं जीवनमान उंचावून तरुण मंडळी रोजगारासाठी शहरात असली तरी गावाकडे एकाकी राहणाऱ्या या वृद्धांना आरोग्याबाबत प्रशासनाचा मजबूत आधार मिळणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी, सिंधुदुर्गहून, निलेश जोशी.**

**नक्षल-आत्मसमर्पण**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात काल 26 नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. यातल्या 13 जणांवर एकंदर 65 लाख रुपयांचं बक्षीस होतं. छत्तीसगडच्या पुनर्वसन योजनेअंतर्गत या नक्षलवाद्यांनी पोलीस आणि सीआरपीएफ अधिकाऱ्यांसमोर शरणागती पत्करल्याचं पोलीस अधीक्षक किरण चव्हाण यांनी सांगितलं. ओडिशा आणि आंध्रप्रदेशातल्या अनेक कारवायांमधे त्यांचा सहभाग होता. या सर्वांना प्रत्येकी 50 हजार रुपयांची मदत देण्यात आली.

**<u>पटेल-मृत्यू-अकोला</u>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष हिदायत पटेल यांचा काल उपचारादरम्यान मृत्यू झाला. हिदायत पटेल यांच्यावर अकोल्यात हल्ला झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणी उबेद पटेल या तरूणाला पोलिसांनी अटक केली आहे. या हल्ल्यातील सर्व गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

**<u>आग-ठाणे</u>**

ठाणे जिल्ह्याच्या बदलापूर एमआयडीसीत एका रसायन कंपनीत काल भीषण स्फोट झाला. या स्फोटानंतर लागलेल्या आगीचे लोळ तीन किलोमीटर अंतरावरून दिसत होते. अधिक तपशिलाची प्रतीक्षा आहे.

**<u>अपघात- नाशिक</u>**

नाशिक जिल्ह्यात आंबेगन शिवारात काल दुपारी दोन चार चाकी वाहनांची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात चार प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला आहे. सहा जखमी महिलांना नशिकच्या शासकीय जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<u>क्रिकेट</u>**

आगामी टी-20 विश्वचषकाचे सामने भारताबाहेर नेण्याची बांगलादेश क्रिकेट मंडळाची मागणी आयसीसीनं फेटाळून लावली आहे. बांगलादेशनं सुरक्षिततेचे कारण देत विश्वचषकासाठी भारतात येण्यास नकार दिला होता आणि सामने दुसऱ्या देशात घेण्याची विनंती केली होती.

**<u>खेलो इंडिया</u>**

दीव मध्ये दुसऱ्या पर्वातील खेलो इंडिया बीच स्पर्धामध्ये काल महाराष्ट्राच्या कबड्डी संघानं विजयी घोडदौड कायम राखत उपांत्य फेरीत मजल मारली. साखळीतील दुसऱ्या लढतीत महाराष्ट्रानं उत्तराखंडचा पराभव केला. बीच सॉकरमध्येही महाराष्ट्राच्या पुरूष संघाने अरूणाचल प्रदेशचा पराभव करीत विजयी आरंभ केला. महाराष्ट्राची दुसरी लढत हिमाचल प्रदेशविरूध्द रंगणार आहे. दीवमधील घोघला समुद्र किनाऱ्यावर या स्पर्धा सुरू आहेत.

**<u>हवामान</u>**

गोंदिया जिल्ह्यात काल सर्वात कमी 7 पूर्णांक 6 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. आज संपूर्ण राज्यात हवामान कोरडं राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.